# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/12/2022 (शनिवार) दुपार

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

**पो. स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील एमकेडी १ मकरधोकडा कोळसा खदान उमरेड येथे दिनांक २७/११/२०२२ चे १०.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– विशाल विजय कुमार गुप्ता, वय ४२ वर्षे, रा. शिवाजी ले आउट, यांचा भाऊ मृतक नामे– विवेक गुप्ता याची पत्नी आरोपी नामे– निकीता गुप्ता हिचे आरोपी क्र. २) नामे–राजु मुत्तेलवार यांचे सोबत अनैतिक प्रेम संबध असल्याचे मृतकाला माहिती होताच मृतकाने आरोपी पत्नी व राजु मुत्तलवार यांना समजाविले. त्यामुळे मृतकाला पत्नी व इतर पाच आरोपीतांकडुन धमकी मिळु लागली. मृतकाची पत्नी ही आरोपी राजु मुत्तलवारला भेटण्याकरीता त्याच्या ढाब्यावर गेली असता मृतक पति हा तिच्या पाठीमागे गेला तेव्हा नमुद आरोपी क्र. १) श्रीमती निकीता उर्फ निक्की विवेक गुप्ता, २) राजु मुत्तलवार, ३) पवन काकडे ४) विजय हेडाऊ, ५) सुभाष गजभिये, ६) दिलीप शिवरकर, सर्व रा. भिवापुर यांनी संगनमत करून मृतकाला हातबुक्क्यांनी मारहाण करून यापुढे आमचे सबंधात मधात येशील तर जिवे मारण्याची धमकी दिली. ज्यामुळे मृतकाचे मानसिक संतुलन बिघडले. असे मृतकाने मृत्यूपुर्वी फिर्यादीस सांगितले. आरोपीतांकडुन होत असलेल्या त्रासाला कंटाळुन मृतकाने स्वत:चे राहते घरी सुसाईट नोट लिहुन विषारी औषध प्राशन केले. मृतकाचे मरणास नमुद आरोपी हे कारणीभुत असुन मृतकास आत्महत्या करण्या करीता परिस्थिती निर्माण केल्याने नमुद आरोपीतांविरूद्ध सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ, पोलीस स्टेशन उमरेड मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर